# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १९२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९२ वी बैठक **शनिवार, दि.१५ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. प्रशांत मारुती पवार व डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड यांनी आपली अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.२७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. २२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | वित्त व लेखा विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्याची वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची / प्रत्यक्ष खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्यास व त्याची एकूण वार्षिक मर्यादा रुपये १,५०,०००/- पर्यंत ठेवण्यास तसेच GFR २०१७ मधील कलम क्र.१५४ नुसार प्रमाणपत्र संबंधीत विभागप्रमुखाकडून घेण्यास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल सादर.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि. ०१ जुलै, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीतील मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल सादर. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२५-२६ च्या मुळ अर्थसंकल्पास मान्यतेची बाब विचारार्थ.**<br><br>(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे सन २०२४-२५ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२५-२६ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरीता समान लेखा संहिता कलम २.१२ (i) नुसार वित्त व लेखा समितीच्या उपसमितीची नियुक्ती मा.कुलगुरु यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात आली होती. | वित्त व लेखा विभाग |

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत,<br>मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य | अध्यक्ष |
| २. | प्रा. (डॉ.) व्ही. बी. पाटील | सदस्य |
| ३. | डॉ. एस. व्ही. शिंदे | सदस्य |
| ४. | श्री. सचिन एम. गायकवाड | सदस्य |
| ५. | सीए (डॉ.) एम. एस. खराडे, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.२६/१२/२०२४, २७/१२/२०२४, ३१/१२/२०२४, ०१/०१/२०२५ व दि.०२/०१/२०२५ दरम्यान विविध विभाग/संकुल प्रमुखासोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा केली व उपलब्ध निधीचा विचार करुन त्याआधारे सन २०२४-२५ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२५-२६ चा मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा अंतिम करुन वित्त व लेखा समितीपुढे सादर करण्यास मा. कुलगुरु यांनी मान्यता दिली आहे.

सबब, विद्यापीठाचा सन २०२४-२५ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२५-२६ चा मूळ अर्थसंकल्प सोबत जोडला असून तो महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ९४ (६) (क) नुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यासाठी वित्त व लेखा समितीच्या दि.२३/०१/२०२५ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.३ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| | ठराव सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२५-२६ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वकष चर्चा होऊन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br><br>सबब, विद्यापीठाचा सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०२५-२६ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (६) (क) व ३१ (ज) नुसार मान्यतेची बाब विचारार्थ. | |
| ठराव : | प्रस्तुत व्यवस्थापन परिषदेमध्ये व अधिसभेमध्ये अर्थसंकल्प सादर करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांचे नामनिर्देशन केले व त्यास सर्व सदस्यांनी अनुमोदन दिले.<br><br>सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२५-२६ च्या मूळ अर्थसंकल्पावर वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) अन्वये मान्यता देऊन अधिसभेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली. | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ४ ]</td><td>

**विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ चा केलेला २० वा वार्षिक अहवाल विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ कलम १३६ (१) नुसार व्यवस्थापन परिषदेने वार्षिक अहवाल स्विकारणे आणि ते अधिसभेकडे पाठविणे अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा २० वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

<table>
<tr><td>१</td><td>डॉ. इ. जा. तांबोळी</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रा. गंगाधर बिराजदार</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रा. अप्पासाहेब डोणे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>प्रा. ॲड. श्रीमती अर्चना जोशी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>प्रा. डॉ. डी. सी. ननवरे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>७</td><td>डॉ. मनोहर जोशी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>८</td><td>श्री. मुकतार शेख</td><td>सदस्य - सचिव</td></tr>
</table>

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करून वेळोवेळी अहवाल समितीच्या बैठका आयोजीत करुन सदरचा अहवाल (पुस्तक स्वरूपात) तयार करून अधिष्ठाता मंडळाच्या दि.११.०२.२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ११ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा २०वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्याची शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६(१) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><td>कलम १३६ (१)</td><td>अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.</td></tr>
</table>

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा तयार केलेला २० वा वार्षिक अहवाल विचारार्थ.)

</td><td>सांख्यिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव :</td><td>

**विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ चा तयार केलेला २० वा वार्षिक अहवाल स्विकारुन सर्वानुमते दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर NAAC Accredited 2022 'B++' Grade (CGPA 2.96)

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(१)] | **विद्यापीठ गेस्ट हाऊस संदर्भात सुधारित नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.१०/०९/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र.१७ वर खालीलप्रमाणे ठराव झालेला होता. | अभियांत्रिकी विभाग |

ठराव:

१ विद्यापीठाच्या सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) तसेच विद्यपीठातील गेस्ट हाऊसचे दर सर्वानुमते खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आले.

२ गेस्ट हाऊसच्या संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१. डॉ.समाधान पवार - अध्यक्ष
२. श्री सचिन मारूती गायकवाड - सदस्य
३. योगिनी घारे- सदस्य सचिव

| अ.क्र. | निवासाचा प्रकार | व्ही आय पी रुम | एसी रुम |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी येणारे अतिथी (विविध प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी) प्रस्तुत व इतर विद्यापीठे आणि त्यांच्या संलग्नीत महाविद्यालयांच्या / इतर शासकीय कार्यालयांच्या / संशोधक व इतर विद्यार्थ्यांच्या कार्यालयीन/ संघटना / खाजगी कामासाठी | ₹१,०००/- | ₹५००/- |
| २ | बाहेरील व्यक्ती / खाजगी संस्था | ₹१,५००/- | ₹१,०००/- |

उपरोक्तप्रमाणे झालेल्या ठरावानुसार गेस्ट हाऊसच्या संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने गेस्ट हाऊस संदर्भात नियमावली तयार करण्याच्या अनुषंगाने दि.२२/११/२०२४ व दि.१८/०१/२०२५ याप्रमाणे २ बैठका घेऊन गेस्ट हाऊस नियमावली व प्रारूपे तयार करुन त्याचा अहवाल दि.१८/०१/२०२५ रोजी विद्यापीठ कार्यालयास सादर केला आहे.

सबब, विद्यापीठाकडील गेस्ट हाऊस वापरासंदर्भात नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव : | **विद्यापीठ गेस्ट हाऊस संदर्भात सुधारित नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [५(२)] | Central Bank of India बँकेची DigiFMS ही Corporate Internet Banking व Payment Gateway **प्रणाली घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.२६/११/२०२० रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ५(७) नुसार, बँक ऑफ इंडियाचे कार्पोरेट नेट बँकींगद्वारे ऑनलाईन पध्दतीने देयके आदा करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठातील सर्व देयके संबंधित व्यक्तीला / महाविद्यालयाला बँक ऑफ इंडिया तसेच इंडिसन्ड बँक यांच्या Corporate Internet Banking मधून आदा करण्यात येत आहेत. तथापि, नविन Beneficiary प्रणाली मध्ये Add करण्यासाठी २४ तास इतका कालावधी आवश्यक आहे. तसेच या प्रणालीमधुन इतर बँक खात्याचे देयके आदा करताना खात्याची पडताळणी होऊ शकत नाही.<br>Central Bank of India शाखा कोंडी यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानूसार त्यांच्याकडील DigiFMS- Corporate Net Banking प्रणालीमध्ये New Beneficiary add करणे व इतर बँक खात्याचे पडताळणी तात्काळ होऊ शकते. तसेच त्यामध्ये इतर सुविधा खूप उपयूक्त आहेत. (उदा. Taxation payment in one click, Real time IMPS Payment for all Amounts) सदर सुविधा पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे. तसेच M/s Edulab Educational Exchange Pvt. Ltd. या कंपनीमार्फत प्रवेश, परीक्षा व इतर सर्व सुविधा कार्यान्वीत करण्यात आले असून सदर प्रणाली मधून महाविद्यालये व विद्यार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने फी Central Bank of India यांच्या Payment Gateway प्रणालीमार्फत स्विकारण्यासाठी सदर प्रणाली घेणे आवश्यक आहे. त्याकरीता Application Form, करारनामा व संबंधीत कागदपत्रे बँकेस द्यावी लागणार आहे.<br>सबब,<br>१. Central Bank of India यांच्याकडून DigiFMS- Corporate Net Banking सुविधाघेण्यास व विभागातील अधिकारी कर्मचारी यांना Maker व Approver रोल सोबत जोडलेल्या Annexure A प्रमाणे देण्यास मान्यता असावी. तसेच विभागातील अधिकारी/ कर्मचारी बदली झाल्यास नविन कर्मचा-यास मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने वेळोवेळी रोल देण्यासही मान्यता असावी.<br>२. ऑनलाईन फी स्विकारण्यासाठी Central Bank of India यांची Payment Gateway प्रणाली घेण्यास मान्यता असावी.<br>३. मान्यतेनंतर प्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यकते फॉर्म व कागदपत्रे भरुन करार करण्यासही मान्यता असावी.<br>उक्त अ.क्र. १ ते ३ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव : | Central Bank of India बँकेची DigiFMS ही Corporate Internet Banking व Payment Gateway **प्रणाली घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(३)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा (Quotation / Tender) ह्या निविदेच्या मुदतीनंतर १५ दिवसांच्या आत निविदेवर कार्यवाही करण्यात यावी अशी दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीत श्री. गणेश डोंगरे यांनी विषय क्र. १४ अन्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव मांडला होता.<br>"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सर्व प्रकारच्या दरपत्रक निविदा (Quotation/Tender) ह्या निविदेच्या मुदतीनंतर १५ दिवसांच्या आत सदर निविदेवर कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."<br>त्यानुसार सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे.<br>ठराव: सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>याबाबत सादर करण्यात येते की, समान लेखा संहिता, २०१२ मधील प्रकरण क्र.४, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८, विद्यापीठ परिनियम क्र.३२१ ते ३२४ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-६, दि.०१ डिसेंबर, २०१६ रोजीचा खरेदी विषयक शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे खरेदीची प्रक्रिया राबविण्यात येते.<br>त्यानुसार सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा प्रसिध्द केल्यानंतरची प्रक्रिया करण्यात येते. त्यामध्ये प्राप्त दरपत्रक / निविदा खरेदी समिती सदस्यांसमोर उघडून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करणे, तक्त्यानुसार न्यूनतम दर असलेले फर्म निश्चित करणे, दरकरार करणे, पुरवठा आदेश देणे, सुरक्षा ठेव स्वीकारणे, साहित्य स्विकारणे, साहित्याची तपासणी करणे व त्याबाबतचा अहवाल तयार करणे, साहित्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेणे, देयकास ॲक्सेशन व अलॉटमेंट करणे, अंदाजपत्रक तरतुद नमुद करणे व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने प्रस्ताव वित्त व लेखा विभागाकडे अदायगीसाठी पाठविणे इ. कार्यालयीन प्रक्रिया करावी लागते. त्यामुळे सदरची प्रक्रिया करण्यासाठी साहित्य / सेवेचा प्रकार इ. विचारात घेऊन यासाठी १५ दिवसाची कालमर्यादा निश्चित | वित्त व लेखा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | होऊ शकत नाही. सदरच्या तपशिलानुसार १५ दिवसापेक्षा कमी / जास्त कालावधी लागू शकतो.<br><br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा (Quotation / Tender) ह्या निविदेच्या मुदतीनंतर १५ दिवसांच्या आत निविदेवर कार्यवाही करण्यात यावी अशी दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव : | **दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा (Quotation / Tender) यांच्या मुदतीनंतर ३० दिवसाच्या आत कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(४)] | **आवर्ती व अनावर्ती खरेदी खर्चास संवैधानिक आधिकारी यांच्या मंजुरीचे अधिकाराची मर्यादा आवर्ती रुपये १,२५,०००/- व अनावर्ती खरेदीची मर्यादा रक्कम रुपये १,२५,०००/- पर्यंत वाढविण्याची बाब विचारार्थ**<br>टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता २०१२ मधील APPENDIX - I मधील अ.क्र. १ मधील आवर्ती खरेदी खर्चास संवैधानिक आधिकाऱ्यांना प्रशासकीय मंजुरीचे अधिकार रुपये ७५,०००/- व APPENDIX - I मधील अ.क्र. २ नुसार अनावर्ती खरेदी खर्चास संवैधानिक आधिकारांना प्रशासकीय मंजुरीचे अधिकारी रक्कम रुपये ५०,०००/- तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.<br>विद्यापीठासाठी समान लेखा संहिताची तरतूद ही सन २०१२ पासून लागू झालेले असून सध्या २०१२ पेक्षा महागाईमध्ये खूपच वाढ झाल्याने प्रत्यक्ष आवर्ती व अनावर्ती खेरदी मर्यादेमध्ये काळानुरुप वाढ झालेली आहे. तसेच आवर्ती खरेदीसाठी रक्कम रुपये ७५,०००/- पुढील व अनावर्ती खरेदीच्या खर्चासाठी रक्कम रुपये ५०,०००/- पुढील साठी वारंवार मा.कुलगुरुमहोदय यांच्याकडे प्रशासकीय मंजुरी साठी जावे लागत आहे, ही बाब विचारात घेता, संवैधानिक आधिकाऱ्यांना आवर्ती खर्चाच्या प्रशासकीय मंजुरीचे खरेदीची मर्यादा रुपये १,२५,०००/- पर्यंत व अनावर्ती खर्चाच्या प्रशासकीय मंजुरीचे खरेदीची मर्यादा ही १,२५,०००/- वाढविणे उचित वाटते. यामुळे खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल.<br>समान लेखा संहिता २०१२ मधील तरतूद Appendix - I मधील<br>Note - १) All the financial powers delegated above are subject to the provisions of the Maharashtra Universities Act, २०१६ (as amended from time to time) and the statutes and Ordinances framed there under and the rules, norms and procedure laid down by the Management Council from time to time and other prevailing rules नुसार आवर्ती व अनावर्ती खरेदी खर्चास प्रशासकीय मंजुरीचे अधिकाराची मर्यादा वाढविण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहेत.<br>सबब, आवर्ती व अनावर्ती साहित्य खर्चास संवैधानिक आधिकाऱ्यांना आवर्ती खर्चाच्या प्रशासकीय मंजुरीचे खरेदीची मर्यादा रुपये १,२५,०००/- पर्यंत व अनावर्ती खर्चाच्या प्रशासकीय मंजुरीचे खरेदीची मर्यादा ही रुपये १,२५,०००/- वाढविण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [५(५)] | **प्रस्तुत विद्यापीठ सामाजिकशास्त्रे संकुलामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि Indian Numismatics, Historical and Cultural Research Foundation, Nashik यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सामंजस्य सेल (MoU Cell) समितीची १९ वी बैठक गुरुवार, दि.२३/०१/२०२५ रोजीच्या बैठकीत सदर करारातील सुचविण्यात आलेल्या दुरुस्तीबाबत निर्णय होवून, सदर सामंजस्य करार (MoU) अंतिम करण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक त्या बाबींची कार्यवाही संकुल स्तरावरुन पुर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार अंतिम करार करावयाची प्रत जोडली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ सामाजिकशास्त्रे संकुलामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि Indian Numismatics, Historical and Cultural Research Foundation, Nashik यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्याची बाब विचारार्थ. | सामाजिकशास्त्रे संकुल |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ सामाजिकशास्त्रे संकुलामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि Indian Numismatics, Historical and Cultural Research Foundation, Nashik यांच्याबरोबर सामंजस्य (MoU) करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(६)] | विद्यार्थी सहायता निधीच्या संदर्भात वित्त व लेखा विभागामार्फत Standard Operating Procedure ( SOP ) तयार करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव : | विद्यार्थी सहायता निधीच्या संदर्भात वित्त व लेखा विभागामार्फत Standard Operating Procedure ( SOP ) करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ४. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ५. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ६. | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्य |
| ७. | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य-सचिव |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद